230२3/29

जा.क्र.माध्य३/१२/नमाशा/मान्यता/पुवि/२०१०
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक :- २९.१०.२०१०

29 OCT 2010

प्रति,

सचिव,
अमृता विद्यालयम बनेश्वर,मु.पो.नसरापूर ता.भोर जिल्हा पुणे.

**विषय :- इंग्रजी माध्यमाच्या इ.७वी पर्यंत सुरु असलेल्याप्राथमिक शाळेस जोडून इयत्ता ८वी ते १० वी चे इंग्रजी माध्यमाचे वर्ग कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत..**

संदर्भः १. शासन निर्णय क्र.नमाशा-२०१०/(९६/२०१०)/माशि-१ दिनांक १०.०३.२०१०
२. शासन पत्र क्र. इंमाशा-२०१०/(२२३/१०)/माशि-१ दिनांक ३०.०७.२०१०
३. शासन निर्णय क्र.नमाशा-२०१०/९६/१०/माशि-१ दि.१४.१०.२०१०
४. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे यांचे पत्र क्रमांक जिप/माध्य/२७३६/१० दिनांक २८.१०.२०१०.
५.जिल्हा पथक पुणे यांची शिफारस

शासनाने संदर्भीय पत्रान्वये आपल्या संस्थेच्या प्राथमिक शाळेस जोडून इंग्रजी माध्यमाचे खालील प्रमाणे वर्ग **कायम विना अनुदान तत्वावर** सुरु करण्यास शासन स्तरावरुन पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात आलेली आहे.**(सन २०१०-२०११ पासून कायम विनाअनुदान तत्वावर)**

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | अमृता विद्यालयम,बनेश्वर मु.पो.नसरापूर ता.भोर जिल्हा पुणे. | अमृता विद्यालयम,बनेश्वर ता.भोर जिल्हा पुणे. | **आठवी ते दहावी** | इंग्रजी. |

८. परवानगी आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत संस्थेने राज्यमंडळाकडे संलग्नता प्रमाणपत्राकरिता (प्रथम प्रोव्हीजनल व नंतर रेग्युलर)अर्ज करणे आवश्यक राहील.
९. सदर परवानगी आदेश राज्य मंडळातर्फे दिल्या जाणा-या संलग्नता प्रमाणपत्राकरिता (रेग्युलर ॲफीलीएशन) आवश्यक असणा-या सर्व निकषांची पूर्तता करण्याच्या अधीन राहतील.
१०. राज्य मंडळाने संलग्नता प्रमाणपत्राकरिता (रेग्युलर ॲफीलीएशन)निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता न केल्यास सदर परवानगी आदेश रद्द समजण्यात येतील.
११. परवानगी दिलेल्या ठिकाणावरुन सदर शाळेचे स्थलांतर करण्यास परवानगी दिली जाणार नाही.
१२. संबंधित शाळेने शासन,शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक),पुणे व राज्य मंडळ यांच्या तर्फे निर्गमित केल्या जाणा-या सर्व आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.
१३. परवानगी देण्यात आलेल्या इ.८वी ते १०वी वर्गामध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम शिकविणे आवश्यक राहील.
१४.परवानगी आदेशाच्यावेळी शाळेत सुरु असलेल्या सर्व वर्गांना परवानगी देण्यात येत आहे.

**इतर अटी :-**

२. आपल्या संस्थेस वर नमूद केलेल्या वर्गांना **कायम विनाअनुदान तत्वावर** मंजूरी देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

२. शासनाच्या पूर्वपरवानगीने निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे सस्थेवर बंधनकारक राहील.
३. कायम विनाअनुदान तत्वावर मिळालेली शाळा असा फलक ठळक अक्षरात शाळेच्या दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा पध्दतीने लावणे हे आपल्या संस्थेवर बंधनकारक आहे.

४. सदर कायम विनाअनुदान मान्यता मिळालेल्या संस्थेने/ शाळेने संबंधित अधिकारी यांचेशी/ शासनाशी पत्रव्यवहार करतांना **कायम विनाअनुदानित शाळा** अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.

५. सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशांचे उदा विद्यार्थांच्या प्रवेशाबाबत तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
६. सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.
७. इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्यकाळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी (इ बी सी) फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमीपत्र या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.
८. जादा उघडण्यात आलेल्यां तुकडयातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यात यावेत तसेच प्रवेशाचे वेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्विकारण्यात येऊ नये.

९. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीज) कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी किंवा वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येऊ नये.

१०. माध्यमिक शाळा संहिता व खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यांत आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

११. शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्रमांक एसएसएन २१०३/(५०/०३) माशि-२,
दिनांक २७ मे २००३ मधील अटी व शर्ती कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक राहतील.
१२.संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टर प्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यांत येईल.
१३. शिक्षक/ कर्मचारी संच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मंजूर करुन देण्यांत येईल.

१४. माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्यावत व परिपूर्ण ठेवण्यांत येईल.
१५. शालेय वातावरण इमारत प्रयोगशाळा इ. बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधांसह ठेवण्यांत येईल.
१६. माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये कार्यबळ गट समिती सभेच्या पूर्व परवानगीशिवाय जादा फी आकारण्यांत येणार नाही.

१७. माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३.२ (१७) अन्वये शाळेत पालक शिक्षक संघाची स्थापना सहा महिन्याचे आत करणे आवश्यक आहे.

**१८. जनहितार्थ याचिका क्रमांक ४४८३/०४ मधील मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.४.२००९ रोजी शाळांमध्ये अग्नि सुरक्षा बसविणे संदर्भात दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणे संस्थेवर बंधनकारक राहील.**

जनहितार्थ याचिका क्रमाक ४८३/२००४ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४ एप्रिल २००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची/ अटींची पूर्तता करण्याचे अटीवरच सदर परवानगी देण्यांत येत आहे. **खालील बाबीबाबतचा तपासणी अहवाल प्रथम मान्यता प्रस्तावाचे वेळेस सादर करणे बंधनकारक राहील.**

१. शाळामध्ये सहा महिन्याच्या आत अग्शिमन यंत्रणा बसविण्यांत यावी.

२. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तु ठेवण्यांत येऊ नयेत.

३. शाळेचा संबंधित कर्मचारीवृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यांत यावे.

४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची बांधली असल्याची खात्री मान्यता देणेपूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची राहील.

५. प्रत्येक शाळेच्या इमारतींची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी (National Building code of India) चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/ कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यांत यावी.

संदर्भ १. शासन पत्र क्रमांक याचिका २००९/ प्र क्र २४४/ प्राशि-४ दिनांक १९ सप्टेंबर २००९

संचालनालयाचे पत्र क्रमांक संकीर्ण २००९/ ६४११६ याचिका १५ क (८) ९३४४ दिनांक २४ सप्टेंबर २००९

**वरील अटींची पूर्तता झाल्याची खात्री करुनच प्रथम मान्यता प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.**

**इतर अटी :**

१. संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक वियवस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या शाळापैकी एखादी शाळेची मान्यता काढून घेतली नाही.
४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. सदर सस्थामार्फत शाळा सुरु करणेसाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

वरील बाबीपैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यांत येईल.

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यता शाळा संहिता नियमावली ३.१ नुसार शाळा सुरु झाल्यापासून एक महिन्याचे आत विहित प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यता करिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पध्दती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहित केलेल्या नियमाप्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

स्थळ प्रतीवर मा.शि.उ.सं.यांची स्वाक्षरी असे.

(बाळासाहेब ओव्हाळ)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१करिता.

प्रतिलिपी :

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे. यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाही करिता अग्रेषित
त्यांना कळविण्यात येते की, वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देऊन पत्रात नमूद केलेल्यां अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करुन अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा तसेच संस्थेविरुध्द तक्रारी व गैरव्यवहाराची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्याविषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर नवीन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणा-या अधिका-यांकडून तपासणी करुन आपल्या अभिप्रायांसह तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

२. मा. सहसचिव शालेय शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार भवन मुंबई-३२.

३. मा. शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक) माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-०१

४. निवडनस्ती